# मी माझ्या भूमिच्या शोधात: एक आंबेडकरी विचारधारा

**प्रा. अरूण डी. मोरे**
मराठी विभाग
पंकज कला व विज्ञान महाविद्यालय चोपडा जि.
जळगांव

---

'मी माझ्या भूमिच्या शोधात' हा जयराज खुने यांचा अतिशय वास्तववादी असा काव्यसंग्रह आहे. या काव्यसंग्रहावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रभाव पडलेला आहे. असे आपणांस दिसते याचे कारण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेला संविधानिक दर्जामुळे कवी मनात स्वातंत्र्य समता, बंधुता व न्याय हे बुध्द तत्वज्ञान त्यांच्या मनामध्ये रुजविलेले दिसून येते. आंबेडकरी विचारधारा ही अखिल प्राणीमात्रावर प्रेम करणारी या भूमीवर, देशावर, प्रेम करणारी विचारधारा आहे. या विचार धारेला जात, वर्ण, धर्म नष्ट करून अखिल मानव प्राणी समान पातळीवर आणावयाचे आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी वर्षानुवर्ष निपचित पडलेल्या दुबळ्या नि मुक्या माणसांना वाचा दिली. माणुसकीने जगण्याची शक्ती आत्मविश्वास व आत्मप्रतिष्ठेचे भान त्यांच्यात निर्माण केली. आंबेडकरी विचारधारा माणसाला मुलकेंद्रस्थानी मानून त्यांचा सर्वांगिण विकास करण्यासाठी प्रयत्नशिल असलेले दिसते. कवी जयराज खुने यांनी आपल्या कवितातून बाबासाहेबांनी निर्माण केलेले आत्मभान आपल्या परिने विकसित केले आहे. आशय आणि आत्मभान प्रामुख्याने सामाजिक असते जे बाबासाहेबांनी निर्माण केले. हीच जाणीव कवी जयराज खुने यांची कवितांची आहे. त्यामुळे ही कामगिरी नि:संशय मोलाची आहे. दलित कविता ही आंबेडकरी उर्जेचे अपत्य आहे. म्हणून ती जातीवाचक नाही तर मानवमुक्तीचा हुंकार आहे. म्हणूनच ती मानवी विषमता वर्णवाद शोषण, अन्याय यांचा निषेध करते. कवी जयराज खुने यांची मानवकेंद्री असलेली कविता सामाजिक आणि सांस्कृतिक निघृण इतिहासावर मार्मिक प्रहार करते. आणि अंधारमुक्त घेऊन प्रकाशाचा वेध घेते. हिच कविची वास्तव भूमी आहे. आणि तो याच भूमिच्या शोधात परिक्रमा करीत आहे. म्हणूनच कवी जयराज खुने यांना इतिहासाचे पुरते भान आहे. म्हणून ते इतिहासाचा गौरव करीत नाही तर इतिहासातील संवदेनशुन्यता शब्दांकित करतात.

" वैदिकांच्या हिता, मनूची संहिता
शुद्रा वाढविती, स्वार्थासाठी "

शतावधी वर्ष येथील धम्रग्रंथानी आणि पुरोहितशाहीने माणसाला गुलाम केले ज्ञानाची कवाडे बंद केली. पशुपेक्षाही हीन वागणूक दिली. संपत्तीचा अधिकार नाकारला पण विसाव्या शतकात प्रज्ञासूर्य उगवला आणि रातकाशतकांचा अंधार लुप्त झाला. अस्तित्व आणि अस्मिता प्रकाशित झाली. कवी जयराज खुने यांनी आपल्या अनेक कवितातून त्यावर केलेले भाष्य अंतर्भेदी आहे. डॉ. बाबासाहेबामुळे आपल्याला ज्ञान परजता आले, जीवनाचा अर्थ कळला, शब्दाची विद्रोही मुद्रा कळली असे कवी जयराज खुने म्हणतात तेव्हा अशी अभिव्यक्ती साकारते.

'माझा शब्द !
पिळवटलेल्या आतड्यातला

दडपलेल्या काळजातला
एक हुंकार कित्येक वर्षाच्या बंदिवासात
पडलेला सजा भोगत
प्रज्ञा सूर्याच्या प्रक्रियेने झाला मुक्त
धगधगता लाव्हा रसा सारखा '

या लाव्हा रसाच्या स्फोटाने सारे जग हादरले आमच्या मेंदूवर रचलेले डोंगर आणि काळजावर बांधलेले मणामणाचे दगड उध्वस्त झाले. आणि शब्द तावून सुलाखून निघाले आपले रक्षण आपल्यालाच करायचे आहे. त्यासाठी पंख मजबूत हवेत. आम्हाला नवी भूमी निर्माण करायची आहे. ही भूमी असेल हास्य दास्यमुक्त, शोषणमुक्त आणि मानतेला साद घालणारी हा विचार आंबेडकरी विचार धारेचा आहे.

"उद्याच्या पिढीसाठी" या कवितेत जयराज खुने यांनी नमुद केले आहे. लेखणी पिढ्यानपिढ्याची बटीक तुमची

मुक्त केली भीम बाबांनी
अन सोपविलीय माझ्या हाती विश्वासानं
तीच लेखणी आज
लिहतेच नवं, फाडतेय जुनं
इतिहासाचं पान
उद्याच्या उज्ज्वल पिढीसाठी

यातून आंबेडकरी विचार धारा लक्ष्यात येते ' पाखरानो' या कवितेत जयराज खुने यांनी डॉ. आंबेडकरांना अभिप्रेत असणारा विचार मांडलेला दिसून येतो.

आता तुम्हीही
इथे स्वतंत्र आहात
या भूमिवर तुमचाही हक्क आहे.
निर्भयपणे जगत रहा
नवी भरारी घेत रहा
पुढे झेपावतांना मात्र मागे पहा !

या काव्य पंक्तीतून डॉ. आंबेडकरांची संविधानिक जाणीव कवी जयराज खुने आणून देतांना दिसून येतात. 'लोकशाही' या कवितामधून तर जयराज खुने यांनी लोकशाही गहाण पडली आहे. सावकाराकडे तांब्याच्या भांड्यासारखी असे सांगितले आहे.

'शब्द' ही कविता जयराज खुने यांची वेगळा विचार व्यक्त करणारी कविता आहे.

शब्द हे केव्हाच झालेत मुक्त
तुमच्या गुलामगिरीतून
म्हणूनच लोळतात
आमच्या ओठावर

बरसतात लेखनीतून
कधी लाव्हा बनून देतात हादरे

कवी जयराज खुने यांनी गुलामगिरीतून वाट करून देतांना या काव्य पंक्तीतून आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. हा कवीचा विचार डॉ. आंबेडकरांच्या विचारांशी एकरूप झालेला आहे. ' जेतवन' या कवितेत तर कवी जयराज खुने यांनी आपल्या मनातील हुंकाराला वाट मोकळी करून दिली आहे.

पिढ्यान पिढ्या
वाटयाला आलेल्या पायवाटेवरून
चालतो आहे मी अनवाणी
माळरानाचा ऊर तुडवत
बोचले जरी काटे
किंवा होरपळले जरी पाय
टाकतोय पाऊल खंबीरपणे....

हया पंक्ती पाहिल्या तर आपल्याला असे दिसते की संविधानामुळे माध्यमातून पिषमतायुक्त परिस्थितीत सुध्दा स्वाभिमानाने जगण्यासाठी प्रेरणा मिळते हा विचार महत्वाचा दिसून येतो पुढे जयराज खुने यांनी ' 'माझं मन धजत नाही ' या कवितेत वास्तव मांडतांना दिसून येतात.

उंटावर बसून शेळ्या हाकणारांनो
तुम्ही देशा साठी झिजले असाल
हे मानायला माझं मन धजत नाही
माझे पुर्वज अगतिक निरक्षर
भाकरीचे गुलाम, तुमच्या हुकूमाचे ताबेदार
म्हणून मानले असतील खरे
तुमचे देशभक्ती देशसेवेचे दावे

येथील दलित वर्गाला भाकरी पुरते मर्यादित ठेवले आहे. त्याची देशभक्ती ही कवीला खरीवाटत नाही ' तुझं अस्तित्व' या कवितेत जयराज खुने यांनी  अन्याय अत्याचाराच्या मशीतून

तुझं अस्तित्व
सुर्याला लाजवणारं
पाषाणाला छेदणारं
पण माणसाला तारणारं
तु पेरून गेलास

डॉ. बाबासाहेब आंबडेकरांनी आयुष्यभर संघर्ष केला आहे हा संघर्ष समाजाच्या उत्यानासाठी त्यांनी केला अन्याय, अत्याचार, विषमता दूरकरण्यासाठी त्यांनी आपले आयुष्य वेचलेले दिसून येते. हेच नाही तर कवी जयराज खुने यांनी ' बाबासाहेब' या कवितेत असे म्हणतात.

बाबासाहेब
ज्ञानामृत पाजून
तुम्हीच फुलविलात वृक्ष
आम्हा सर्वांसाठी
त्याची फळे खातोय
आज चवीने

यातून कवी बाबासाहेबाच्या विचारांचे आणि कर्तृत्वाचे ऋण व्यक्त करतांना दिसतात. 'भूमिच्या मशागतीसाठी' या कवितेत कवी जयराज खुने निक्षूण सांगतात

स्वाभिमान गहाण टाकणारांनी
आता तरी
शोधायला हवा स्वत्व स्वाभिमान
झटकायला हवी मरगळ
पायाखाली घेतला पाहिजे
डोक्यावर घेतलेला मनू

यातून समाजातलं वास्तव जयराज खुने दाखवून देतात. जयराज खुने यांनी ' मी माझ्या भूमीच्या' शोधात' या काव्यसंग्रहातून शोषित दलित माणसाचा स्वाभिमान शोधला पाहिजे मनू प्रणित विचार डोक्यातून झटकून टाकला पाहिजे जयराज खुने यांची कविता स्व जाणिवा बरोबरच समूह जाणिवांची अभिव्यक्ती करणारी निर्मिती ठरलेली आहे. ती विद्रोहात्मक चेहरा घेऊनच अवतरते या काव्यसंग्रहाची भाषा मनाचा ठाव घेणारी आहे. ती इथल्या परंपरा, रुढी आणि संस्कृती यांना नकार देते. रोकठोक परखड आणि स्पष्ट भाषेतून ती व्यक्त होते ही कविता मुक्ताछंदातून व्यक्त होणाऱ्या या कवितेला कलात्मकेचा कमालीचा निटकारा आहे. ही कविता माणसाचे जगणे माणसाचे स्वाभिमान चित्रीत करते. समाजभिमुखता हा तिचा विशेष आहे कवी जयराज खुने यांची कविता समाजातील सर्वच प्रश्नांची दखल घेते.

आधुनिक काळात इथल्या मुलनिवासी लोकांचे स्थान काय याबदल ती चिंतन व्यक्त करते. ती संयतपणे आपले म्हणणे मांडते. परिणामी चिंतनशीलता हा तिचा स्थायीभाव बनलेला आहे हे मात्र खरे-


- मी माझ्या भूमिच्या शोधात - जयराज खुने
- गोलपिठा - नामदेव ढसाळ
- गावकुसाबाहेरील कविता - वामन निंबाळकर
- दलित साहित्य वेदना आणि विद्रोह - भालचंद्र फडके
- दलित साहित्य : आजचे क्रांती विज्ञान - बाबुराव बागुल
- दलित साहित्य उद्गम आणि विकास - डॉ. योगेंद्र मेभाम